संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

“नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणा-या लोकसंख्या वैशिष्ट्ये व समस्यांचा अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेअंतर्गत
भूगोल विषयाच्या पीएचडीसाठी सादर

संशोधक

जोंधळे संगिता गंगाधर
(एम. ए.भूगोल)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नामदेव केशवराव वाघमारे
(एम. ए. सेट, पीएच. डी.)
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड

ऑगस्ट 2023

"नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणा-या लोकसंख्या वैशिष्ट्ये व समस्यांचा अभ्यास"

प्रस्तावना:

अठराव्या शतकाच्या मध्यापासून युरोप खंडात औद्योगिककरणाला सूरूवात झाली. औद्योगिककरणाचा प्रसार हळूहळू विविध देशात होऊ लागला. काळाच्या ओघात औद्योगिककरण अत्यंत झपाट्याने होऊन शहरांची वाढ ही वेगाने होऊ लागली. शहरांमध्ये वेगाने वाढणाऱ्या औद्योगीकरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराची उपलब्धता झाली. त्यामुळे ग्रामीण भागातील बेकारांना रोजगार मिळू लागल्याने लोकसंख्येचे लोंढेच्या लोंढे शहराकडे धावू लागले. शहरांमध्ये त्यांच्या निवासाची सोय नसल्याने ते जागा मिळेल तेथे झोपड्या करून राहू लागले. यातूनच शहरामध्ये झोपडपट्ट्यांची निर्मिती झाली. झोपडपट्ट्यांची निर्मिती हा वाढत्या नागरीकरणाचा परिणाम आहे.

मानवाचे आरोग्य तो राहात असलेल्या निवा-यावर व तेथील पर्यावरणावर अवलंबून असते. परंतु झोपडपट्टीमधील निवारे हे आरोग्याचे रक्षण करण्यास पूर्णपणे असमर्थ ठरले आहेत. सर्वसाधारणपणे झोपडपट्टीतील जीवन निकृष्ट दर्जाचे आहे. तेथे राहणाऱ्या लोकांना मूलभूत सुविधापासून वंचित रहावे लागते. पिण्याचे स्वच्छ पाणी, मूलमूत्र, सांडपाणी विसर्जनासाठी गटारांची व्यवस्था नसते, आरोग्यविषयक सुविधांचा अभाव, दोन झोपड्यामध्ये कमी अंतर, रस्ते अतिशय अरुंद व अस्वच्छ असतात. झोपड्या एकमेकींना चिकटून असल्याने प्रकाशाचा शिरकावही होत नाही. त्यामुळे तेथील लोकांना अनेक रोगांना बळी पडावे लागते. झोपडपट्ट्यामध्ये रोगराईचा प्रसार त्वरित होतो, म्हणूनच झोपडपट्ट्यांना आजारांचे माहेरघरच म्हणतात.

2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 5.4% लोकसंख्या व महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 10.5% लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये राहते. भारतातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येपैकी 18.1 % लोकसंख्या व एकूण झोपडपट्ट्यातील कुटुंबापैकी 17.8 % कुटूंब महाराष्ट्रात राहतात. नांदेड शहरातील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता 1971 मध्ये शहरातील एकूण लोकसंख्येच्या 1.58%, 1981 मध्ये 33.46%, 1991 मध्ये

32.33%, 2001 मध्ये 36.37% तर 2011 च्या जनगणनेनुसार नांदेड शहरामध्ये शहरातील एकूण लोकसंख्येच्या 38.80% लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये राहते.

प्रस्तूत संशोधनामध्ये नांदेड शहरातील झोपडपट्ट्यांचे वितरण, झोपडपट्ट्यांत राहणा-या लोकसंख्येची वैशिष्टे, झोपडपट्ट्यातील लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती, झोपडपट्ट्यातील सेवा सुविधांची स्थिती व झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या विविध समस्याचा अभ्यास करून समस्या सोडविण्यासाठी उपाय सूचवण्यात येणार आहेत.

अभ्यासाचे महत्व

नांदेड शहरातील झोपडपट्ट्यांचे वितरण, त्यात राहणा-या लोकसंख्येची वैशिष्टे, झोपडपट्ट्यातील लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती, झोपडपट्ट्यातील विविध सेवा सुविधांची उपलब्धता व झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या विविध समस्या जाणून घेऊन समस्या सोडविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

विषय निवडः

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे नागरिकरण वेगाने होत आहे. वेगाने वाढणाऱ्या नागरीकरणांमूळे नगरांची व महानगराची वाढ वेगाने होत आहे. या वेगाने वाढणा-या नगरांमध्ये व महानगरामध्ये झोपडपट्ट्यांची संख्या ही वेगाने वाढत आहे. वेगाने वाढणाऱ्या या झोपडपट्ट्या म्हणजे अनेक समस्यांची केंद्र बनलेली आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. पिण्याचे स्वच्छ पाणी, मूलमूत्र, सांडपाणी विसर्जनासाठी गटारांची व्यवस्था नसते, आरोग्यविषयक सुविधांचा अभाव, दोन झोपड्यामध्ये कमी अंतर, रस्ते अतिशय अरुंद, अस्वच्छ हवा, कचऱ्याचे व घाणीचे साम्राज्य व दुर्गंधीमूळे रोगराईचा प्रसार त्वरित होतो. झोपड्या एकमेकींना चिकटून असल्याने सूर्य प्रकाशही मिळत नाही. त्यामुळे तेथील लोकांना अनेक रोगांना बळी पडावे लागते. झोपडपट्ट्या म्हणजे अनेक समस्यांचे केंद्रच असते. अशा असंख्य समस्याने ग्रासलेल्या वस्तीतील गोरगरीब लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती आणि विविध समस्या जाणून घेण्यासाठी व त्या सोडवण्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजना करण्याच्या हेतूने या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

उद्दिष्टे:

१) नांदेड शहरातील झोपडपट्ट्यांचे वितरण अभ्यासणे.

२) नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणा-या लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४) नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

५) नांदेड शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येच्या विविध समस्या सोडविण्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजना सुचवणे.

माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती:

सदर संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्वरूपाच्या माहिती स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक माहिती स्त्रोतामध्ये निरीक्षण, प्रश्नावली, अनुसूची व प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार आहे तर द्वितीय स्वरूपाच्या माहिती स्त्रोतामध्ये दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, शोधनिबंध, संशोधन अहवाल, विविध कार्यालयातील अहवाल व विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

विविध माहिती स्त्रोतांच्या आधारे संकलित केलेल्या आकडेवारीचे सारणीकरण करून सारण्यांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करण्यात येणार आहे. झोपडपट्टीतील लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचे मोजमाप करण्यासाठी विविध सूत्रांचा उपयोग करण्यात येणार आहे. विविध सूत्रांचा उपयोग करून प्राप्त झालेल्या आकडेवारीचे सादरीकरण करण्यासाठी विविध आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध प्रकारचे आलेख, नकाशे व आकृत्यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

अभ्यास क्षेत्र:

नांदेड शहर हे महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात असलेले आणि नांदेड जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. या शहराला ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेला आहे. नांदेड शहराचे अक्षवृत्तीय स्थान 19^0 10’ 11” व रेखावृत्तीय स्थान 77^0 19’ 10” पूर्व रेखावृत्त असे आहे. नंदागिरी उर्फ नंदीग्राम या प्राचीन किल्ल्याच्या नावावरून या शहराला प्रथम नंदीग्राम आणि कालांतराने अपभ्रंश होऊन नांदेड हे नाव पडले आहे. नांदेड शहरी क्षेत्र 63.22 चौरस किलोमीटर

आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, नांदेड शहराची लोकसंख्या 550,564, लिंग गुणोत्तर 924, साक्षरता दर 87.40 टक्के होता.

संबंधित साहित्याचा आढावा:

१) के. रंगराव यांनी 1974 मध्ये सिटी अँड स्लम स्टडी ऑफ कॉर्टर्स सेटलमेंट इन सिटी ऑफ विजयवाडा या संदर्भाने शहरातील झोपडपट्टी समस्येवर प्रकाश टाकलेला आहे.

२) भुसे आशिष यांनी 1978 मध्ये भारतातील नागरिकरण या विषयावर एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्या ग्रंथामध्ये नागरीकरणामुळे निर्माण होणारी प्रश्न आणि झोपडपट्ट्या याचे विवेचन केलेली आहे.

३) मीरा बापट यांनी 1981 मध्ये पुणे शहरातील सात झोपडपट्ट्यांचा अभ्यास केला झोपडपट्ट्यातील व्यावसायिक रचना व पुण्यातील इतर लोकांपेक्षा ते वेगळे आहेत का या संदर्भाने अभ्यास केलेला आहे

४) चौधरी पी. एल. यांनी 1982 मध्ये पुणे शहरातील झोपडपट्टीचे राजकारण आणि प्रशासन या विषयावर अभ्यास करून झोपडपट्टी भागातील राजकारणावर प्रकाश टाकलेला आहे.

५) देसाई ए. आर. आणि पिलाई एस. डी. यांनी 1990 मध्ये झोपडपट्टी आणि नागरिकरण या संदर्भाने स्पष्टीकरण केलेले आहे. नागरिकरण झोपडपट्ट्या निर्माण होण्यासाठी कशा पद्धतीने कारणीभूत आहे याचे विवेचन केले आहे.

६) देसाई ए. आर आणि पिलाई एस. डी. यांनी 1990 मध्ये झोपडपट्ट्यांचे स्वरूप या ग्रंथामध्ये झोपडपट्ट्यांची निर्मिती, झोपडपट्ट्याच्या समस्यावर विस्तारित विश्लेषण केले आहे.

७) डॉ. संध्या आहुजा यांनी 2013 मध्ये 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील राज्यनिहाय झोपडपट्टीतील लोकसंख्येची वैशिष्टे स्पष्ट केले आहे.

८) विद्या यादव व आर. बी. भगत यांनी 2017 मध्ये मुंबईतील झोपडपट्टीचा अभ्यास केलेला आहे त्यात त्यांनी मुंबईतील विविध झोपडपट्टी भागाचे विश्लेषण केलेले आहे

प्रकरण य़ोजना:

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे - झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती

प्रकरण चौथे - झोपडपट्ट्यामध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचे वितरण, घनता व वाढ

प्रकरण पाचवे - झोपडपट्ट्यामध्ये राहणाऱ्या लोकसंख्येची साक्षरता, लिंग गुणोत्तर व व्यवसायीक रचना

प्रकरण सहावे - झोपडपट्टीतील विविध सेवा सुविधा व समस्या

प्रकरण सातवे - निष्कर्ष व उपायोजना

संदर्भ ग्रंथ

1) **Bose Ashish (1978): "India's Ubranization - 1901- 2001" Assisted by jatinder Bhatia, Tata Mc Graw Hill Publishig Company Ltd. New Delhi**
2) **Chaudhari P. L. (1982): "Politics and Administration of Slums in Poona City" University of Pune - Unpublished Phd. Thesis.**
3) **Ranga Rao K and M. S. A. (1984): Cities and Slum : A Study of Squatters Settlement in the city of Vijaywada, Concept Publishing Company, New Delhi.**
4) **Desai A. R. and Pillai S. D. (1990): "Slums and Urbanization" Popular Prakashan, Bombay,**
5) **Desai A.R. and Pillai S.D. (1990): "The Nature of Slums" Popular Prakashan Bombay.**
6) **Government of Maharashtra A Report On 'Particulars of Slums' Based On Data Collected In State Sample of 69th Round Of National Sample Survey (July, 2012 – December, 2012) VOL.I**
7) **Dr Sandhya Ahuja (2013) "Analysis – Slum Population Census -2011"**
8) **Vidya Yadav, R. B. Bhagat (2017): "Changes in slum population and living conditions of slum dwellers in Mumbai" Mumbai Reader 2017**
9) **Dr. Y Janaki Ramudu, Dr. N. Tulasi Lakshmi, Dr. C Balakotaiah and Dr. M Rambabu (2022): "State wise status of urban slums in India: Census data" International Journal of Applied Research**
10) **Report of the Committee on Slum Statistics/Census**

11) **Government of India Ministry of housing and urban poverty and Alleviation National Buildings Organisation New Delhi**

12) कुमुदिनी दांडेकर (2005) झोपडपट्ट्या व नागरीकरण

13) शिंदे शाम (2018): लातूर शहरातील झोपडपट्टी वाशीयांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि राजकारण एक चिकित्सक अभ्यास

14) प्रियांका आबासो शिंदे शहरीकरण आणि झोपडपट्टी ची समस्या नवीजोत व्हॅल्यू सात इशू एक

15) देशपांडे राजेश्वरी (1999): “शहरी गरिबांचे राजकारण” समाज प्रबोधन पत्रिका

16) बेग रेहाना आरा (2001): “शहरातील झोपडवाशियांची सामाजिक- आर्थिक परिस्थिती आणि राजकारण” पुणे विद्यापीठ अप्रकाशित शोध प्रबंध

17) पुणे शहर महापालिका हद्द झोपडपट्टी पाहणी अहवाल 1969 पुणे जनता संपर्क कार्यालय

18) नागमोते सोनाली (2006): “पुणे शहरातील झोपडपट्टी वाशीयांचे जीवन व राजकारण” पुणे विद्यापीठ प्रकाशित शोध प्रबंध

संशोधक | **मार्गदर्शक**

जोंधळे संगिता गंगाधर (एम. ए. भूगोल) | **प्रा. डॉ. नामदेव केशवराव वाघमारे**